# अधिक पाणी पिणे आरोग्यास हानीकारक !

आरोग्यवार्ता

**नवी दिल्ली :** योग्य प्रमाणात पाणी प्यायलास आरोग्यासाठी ते हितकारक असते. परंतु कुठलाही अतिरेक चांगला नसतो, या तत्त्वानुसार जास्त पाणी पिणे हेही अनारोग्यकारक असते. जास्त पाणी पिण्याने सुदृढ निरोगी व्यक्तीची तब्येत बिघडू शकते.

तज्ज्ञांच्या मते ज्यांना मूत्रपिंडाचे विकार आहेत त्यांनी जास्त पाणी प्यायल्यास त्यांच्या मूत्रपिंडांना हे जास्तीचे पाणी शरीराबाहेर टाकताना ताण येऊन इजा पोहोचू शकते. परिणामी रक्तातील सोडियमचे प्रमाण खूप कमी झाल्याने 'हायपोनाट्रेमिया' हा प्राणघातक विकार होण्याची जोखीम वाढते. त्याचबरोबर जास्त पाणी प्यायल्याने स्नायू कमकुवत होणे, पेटके येणे किंवा आकडी येण्यासारखे प्रकार होऊ शकतात. जर आपल्याला सतत तहान लागत नसेल, आपल्या मूत्राचा रंग फिकट पिवळा अथवा रंगहीन असेल तर आपल्या शरीरात संतुलित मात्रेत पाणी असल्याचे ते लक्षण आहे. एका प्रौढ व्यक्तीस दररोज आठ ते बारा पेले पाणी पुरेसे असते. आपल्या शरीराच्या प्रत्येकी २० किलोला एक लिटर पाणी लागते. उदाहरणार्थ जर तुमचे वजन साठ किलो असेल, तर तुम्हाला प्रतिदिन तीन लिटर पाण्याची गरज आहे, असे तज्ज्ञ सुचवतात. आहारतज्ज्ञांच्या मते पुरुषांना सरासरी १५.५ कप (३.७ लिटर) व स्त्रियांना ११.५ कप (२.७ लिटर) पाणी पुरेसे ठरते. ही गरज थेट पाण्याशिवाय, आपण दिवसभर घेत असलेली पेय आणि अन्नातूनही पूर्ण होते. आपल्या आहारातून दैनंदिन २० टक्के पाणी शरीराला मिळते. उर्वरित थेट पाणी अथवा पेयांतून मिळते. ५० टक्के साधे पाणी आणि ५० टक्के दूध, फळे, भाजीपाल्यातून आपल्या शरीराची पाण्याची गरज भागवणे योग्य ठरते.

आपले पर्यावरण, ऋतू, व्यायाम, व्यक्तिनिहाय आरोग्य, गर्भवती आणि बाळाला स्तनपान देणारी माता यानुसार पाण्याची गरज व्यक्तिनिहाय बदलते. शरीराला जास्त पाणी झाल्यास आपल्याला मळमळते. उलटी होते. प्रसंगी डोकेदुखीचा त्रास होतो. गोंधळ उडणे, आजूबाजूच्या परिसराचे भान न राहो, स्नायू आखडणे आदीचा त्रास होतो, असे तज्ज्ञ सांगतात.




शारंगधर® आपल्याला देते QSE प्रॉमिस
Quality (गुणवत्ता)
✔ प्रत्येक वनस्पतीची व अंतिम उत्पादनाची अत्याधुनिक प्रयोगशाळेत चाचणी.
✔ Sharangdhar Ayurvedic Clinical Research Center
✔ GMP व ISO-9001:2015 प्रमाणित कंपनी.
✔ औषधी वनस्पतींची स्वत:ची लागवड.
✔ अत्याधुनिक मशिनद्वारे स्वच्छतेचे काटेकोर पालन करून बनविलेली उत्पादने.
Safety (सुरक्षितता)
✔ Heavy Metal व Steroid विरहित उत्पादने.
✔ रासायनिक प्रक्रिया विरहित उत्पादन पद्धती.
✔ 100% Natural, No Side Effects
✔ गेल्या ३० वर्षांपासून प्रत्येक उत्पादनावर Expiry Date घालणारी एकमेव कंपनी.
✔ गोळ्यांच्या स्वरूपात असल्यामुळे योग्य तेवढ्याच मात्रेत औषधांचे सेवन.
Efficacy (हमखास रिझल्ट)
✔ औषधे आवरण विरहित (Uncoated) असल्यामुळे टॅब्लेटस् जिभेवर ठेवताच परिणाम होण्यास सुरूवात होते.
✔ औषधी वनस्पतींवर कोणतेही रासायनिक फेरफार न करता मुळ स्वरूपात वापरत असल्याने त्यातील सर्व कार्यकारी घटक (All Active Ingredients) शरीराला मिळतात आणि त्यामुळेच शारंगधरची औषधे अधिक परिणामकारक ठरतात.
✔ रोगाचा समूळ नाश करणारी शारंगधरची संपूर्ण उपचार पध्दती.
Customer Care - 92255 15525

# वैद्यकीय चाचण्यांना नुकसानभरपाईचे बंधन

## ऑनलाइन औषधविक्रीवर अंकुश; नव्या कायद्याचा मसुदा जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** वैद्यकीय चाचणी करताना एखादी व्यक्ती जखमी किंवा तिचा मृत्यू झाल्यास नुकसानभरपाई देणे आता बंधनकारक आहे. नव्याने येणाऱ्या 'औषधे, सौंदर्य प्रसाधने आणि वैद्यकीय उपकरणे २०२२' च्या कायद्याच्या मसुद्यामध्ये हे स्पष्ट करण्यात आले असून ऑनलाइन औषधविक्रीवर अंकुश आणि वैद्यकीय उपकरणांच्या आयात, विक्रीवरही निर्बंध आणणाऱ्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

नव्या कायद्याची रचना करण्याची प्रक्रिया केंद्रीय आरोग्य विभागाने सुरू केली असून याचा मसुदा सूचना आणि हरकतींसाठी उपलब्ध केला आहे. या मसुद्यामध्ये वैद्यकीय चाचण्यांचे नियमन करण्याच्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. कोणत्याही पूर्वपरवानगीशिवाय नव्याने निर्मिती केलेल्या औषधांच्या वैद्यकीय चाचण्या करता येणार नाहीत. वैद्यकीय चाचण्यांदरम्यान एखादी व्यक्ती जखमी किंवा मृत्यू झाल्यास त्याला किंवा त्याच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देणे बंधनकारक असेल. वैद्यकीय चाचण्यांना परवानगी देणारी समिती योग्यरितीने कार्यवाही करीत नसल्यास ती बरखास्त करण्याचे अधिकार केंद्रीय परवाना यंत्रणांना असतील. परवानगीशिवाय वैद्यकीय चाचण्या केल्यास तीन ते पाच लाखांपर्यंत दंड ठोठावण्यात येईल. चाचण्यांसाठी आवश्यक वैद्यकीय व्यवस्थापन न केल्यास किंवा रुग्णास नुकसानभरपाई न दिल्यास एक वर्षापर्यंत कारावास आणि नुकसानभरपाईच्या दुप्पट रक्कम द्यावी लागणार आहे, असे मसुद्यात नमूद केले आहे.

ऑनलाइन औषध विक्रीबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये नियमन नाही. नव्या कायद्यामध्ये ऑनलाइन औषधविक्रीचाही समावेश केला आहे. यानुसार कोणत्याही व्यक्तीला अशा पद्धतीने औषधांची विक्री, साठा, पुरवठा करता येणार नाही. यासाठी संबंधित यंत्रणांमार्फत परवानगी किंवा परवाना दिले जाईल, असे मसुद्यात म्हटले आहे.

ऑनलाइन औषधांची विक्री किंवा वितरणाबाबत एवढाच उल्लेख या मसुद्यात केलेला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात हे नियमन कसे असेल याबाबत अस्पष्टता आहे. सध्या वैद्यकीय उपकरणांबाबत नियमावली लागू असली तरी त्याचा कायद्यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. नव्या कायद्यामध्ये या उपकरणांच्या नियमनाबाबतही तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच याबाबत केंद्रीय आरोग्य विभाग आणि राज्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वैद्यकीय उपकरणे तांत्रिक सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात येणार आहे.

### आयुर्वेद, सिद्धा, होमियोपॅथी, युनानीबाबत स्वतंत्र तरतुदी...

नव्या कायद्यामध्ये अलोपॅथीसह आयुर्वेद, सिद्धा, होमियोपॅथी, सोवा रिग्पा या शाखांबाबत मसुद्यात स्वतंत्र विभाग आहे. यासाठी स्वतंत्र तांत्रिक सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात येणार आहे. तसेच यामध्ये नव्या औषधांचा विकास, संशोधन करण्यासाठी वैज्ञानिक संशोधन मंडळाची स्थापना करण्यात येईल. यासाठी केंद्रीय आणि राज्यात स्वतंत्र प्रयोगशाळा स्थापन कराव्यात. या शाखांतील वैद्यकीय चाचण्या, विक्री, वितरण यांचे नियमन करणाऱ्या तरतुदीही मसुद्यात समाविष्ट केलेल्या आहेत.



### कायदा सुधारित होण्यास मदत...

नव्या कायद्यामध्ये वैद्यकीय चाचण्यांबाबतचे नियम आणि नुकसानभरपाई बंधनकारक केलेली आहे. सध्याच्या कायद्यामध्ये छोटा गुन्हा केला तरी कारावासाची शिक्षा नमूद आहे.

नव्या मसुद्यामध्ये दंडाची तरतूद केलेली आहे. औषधांचे संशोधन आणि विकास याबाबतही नियमन करणाऱ्या तरतुदींचा समावेश केलेला आहे. हा कायदा मंजूर झाल्यास सध्याचा कायदा सुधारित होण्यात मदत होईल, असे राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त डॉ. द. रा. गहाणे यांनी सांगितले. कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या केंद्रीय समितीचे ते सदस्य आहेत.

## कांदिवली स्थानकात लोकलच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** लोकलच्या धडकेत एका ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी संध्याकाळी कांदिवली स्थानकात घडली. या घटनेनंतर त्याच्या मित्रांनी घटनास्थळावरून पळ काढल्याने याप्रकरणी घातपाताचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

कांदिवली स्थानकातील फलाट क्रमांक एकवर विरारला जाणाऱ्या लोकलची धडक एका तरुणाला बसली. या वेळी त्याच्यासोबत दोन मित्र होते. फलाटावरून चालत असतानाच त्याला एका मित्राने स्पर्श केल्याचे आणि घटनेनंतर त्याच्या मित्रांनी पळ काढल्याचे सीसीटीव्ही कॅमेरातील चित्रीकरणात दिसत आहे.

# नीरव मोदीची हाँगकाँगमधील २५३ कोटींची मालमत्ता जप्त

**मुंबई :** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नीरव मोदी समूह कंपन्यांच्या २५३ कोटी ६२ लाख रुपये किमतीची हाँगकाँगमधील मालमत्ता जप्त केली. त्यात रत्ने, दागिने आणि बँक ठेवींचा समावेश असल्याची माहिती ईडीने शुक्रवारी दिली. या प्रकरणातील एकूण जप्त केलेल्या मालमत्तेची किंमत २ हजार ६५० कोटी ७ लाख रुपये आहे.

नीरव मोदी समूहाच्या हाँगकाँगमधील कंपन्यांच्या काही मालमत्ता या हिरे, दागिने आणि खात्यांमधील ठेवींच्या रूपात होत्या. त्या मालमत्ता आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा, २००२ (पीएमएलए) कलमांतर्गत तात्पुरत्या जोडल्या गेल्या आहेत, असे ईडीकडून सांगण्यात आले.

मोदी सध्या ब्रिटनच्या तुरुंगात असून त्याने पंजाब नॅशनल बँकेची दोन अब्ज डॉलरची (सुमारे ६ हजार ४९८.२० कोटी रुपये) फसवणूक केल्याचा आरोप असून तो या प्रकरणात मुख्य आरोपी आहे. केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) या प्रकरणी चौकशी करत आहे. ईडीच्या म्हणण्यानुसार, ६ हजार ४९८.२० कोटी रुपयांच्या पीएनबी बँकेच्या फसवणूक प्रकरणात गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा, २००२ (पीएमएलए) अंतर्गत सक्तवसुली प्रकरण माहिती अहवाल नोंदवून तपास सुरू केला होता.

## सलमान खानचा बंदुकीच्या परवान्यासाठी अर्ज



**मुंबई :** चित्रपट अभिनेता सलमान खान आणि त्याचे वडील सलीम खान यांना गेल्या महिन्यात धमकीचे पत्र आले होते. या पार्श्वभूमीवर सलमान खानने शुक्रवारी मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांची भेट घेतली. या वेळी त्याने बंदुकीच्या परवान्यासाठी अर्ज केला.

पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला याच्या हत्येनंतर बिश्नोई टोळीकडून सलमान खान याला धोका असल्याची चर्चा सुरू होती.

पश्चिम रेल्वे
देखभालीची कामे
ई-टेंडर नं.: डब्ल्यूआर-एमएमसीटी०ईसब (ईएसओटी)/४/२०२२ दि. २०.०७.२०२२. कामाचे नाव: चर्चगेट-विरार सेक्शन यातील ४-व्हीलर टॉवर वॅगन्स यांच्या देखभालीचे कंत्राट (२०२२-२०२४). कामाचा अंदाजे खर्च: ₹ २९,८७,७६७/- बोली सुरक्षेची किंमत: ₹ ५९,८००/- बोली सादर करण्याची विहित नमुन्यात तारीख आणि वेळ: २२.०८.२०२२ रोजी १५.०० वाजेपर्यंत. उघडण्याची तारीख आणि वेळ: या निविदा सीनि. डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनीयर (सब), पश्चिम रेल्वे यांचे कार्यालय, मुंबई सेन्ट्रल, मुंबई-४०० ००८ येथे दि. २२.०८.२०२२ रोजी १५.३० वाजता उघडण्यात येतील. देकाराची वैधता: उघडण्याच्या तारखेपासून ६० दिवस. वेबसाइटचा तपशील: ही निविदा www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येईल आणि त्यामार्फत सादर करावी लागेल. 0284
Like us on : facebook.com/WesternRly

भारतातील सर्वात लोकप्रिय
अधिकतम ताकद, अधिकतम स्फूर्ती
ZEEGOLD
कॅप्सूल्स
सिरप
मल्टी-विटामिन, मल्टी-मिनरल यासह
कोरियन जिनसेंग
नियमित पोषण पूरक
सर्व प्रमुख केमिस्ट स्टोअर्समध्ये उपलब्ध
कस्टमर केअर
9896134500




# राज्यात 'स्वाइन फ्लू'चा संसर्ग वेगाने

## १४२ जणांना बाधा, सात जणांचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात स्वाइन फ्लूचा प्रादुर्भाव वाढत असून आत्तापर्यंत १४२ रुग्णांना बाधा झाली आहे, तर सात जणांचा मृत्यू झाला. पावसाळा सुरू होताच स्वाइन फ्लूने डोके वर काढले आहे.

राज्यात ८ जूनपर्यंत ८ जणांना स्वाइन फ्लूची बाधा झाली होती, तर शून्य मृत्यूची नोंद होती. जुलैपासून सुरू झालेल्या जोरदार पावसानंतर या आजाराचा संसर्ग वाढला आहे. गेल्या दहा दिवसांत स्वाइन फ्लूचे १२६ रुग्ण आढळले आहेत, तर सात जणांचा मृत्यू झाला आहे.

या आजाराच्या नियंत्रणासाठी सर्वेक्षण, प्रतिबंध व आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत, असे आरोग्य विभागाने सांगितले.

सर्वाधिक रुग्ण मुंबईत...

राज्यात आत्तापर्यंत आढळलेल्या रुग्णामध्ये सर्वाधिक म्हणजे ४३ रुग्ण मुंबईत आढळले आहेत. रुग्णसंख्या जास्त असली तरी मुंबईत मृतांची संख्या मात्र शून्य नोंदली आहे. त्याखालोखाल पुण्यात २३, पालघर २२, नाशिक १७, नागपूर महापालिका १४, कोल्हापूर महापालिका १४, ठाणे महापालिका ७ आणि कल्याण डोंबिवलीमध्ये दोन रुग्ण आढळले आहेत. सर्वाधिक तीन मृत्यू कोल्हापूरमध्ये झाले. पुणे आणि ठाणे महापालिकेत प्रत्येकी दोन मृत्यूंची नोंद झाली.

# हार्बर, पश्चिम रेल्वे मार्गावर उद्या मेगा ब्लॉक

## भायखळा-माटुंगादरम्यान आज रात्रकालीन ब्लॉक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** तांत्रिक कामांसाठी रविवारी, २४ जुलैला हार्बर मार्गावर पनवेल - वाशीदरम्यान आणि पश्चिम रेल्वे मार्गावर सांताक्रूझ - गोरेगावदरम्यान अप-डाऊन जलद मार्गावर मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील भायखळा - माटुंगादरम्यान जलद मार्गावर शनिवार, २३ जुलैच्या रात्री ११.३० पासून ब्लॉक घेण्यात येईल. त्यामुळे लोकल भायखळा ते माटुंगादरम्यान धिम्या मार्गावर धावतील.

पनवेल - वाशीदरम्यान रविवारी सकाळी ११.०५ ते दुपारी ४.०५ वाजेपर्यंत मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे सकाळी १०.३३ पासून दुपारी ३.४९ वाजेपर्यंत पनवेलहून सीएसएमटीला जाणाऱ्या आणि सीएसएमटीहून पनवेल, बेलापूरला सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ पर्यंत जाणाऱ्या लोकलच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच ठाणे - पनवेल या ट्रान्स हार्बरवरील दोन्ही मार्गांवरील लोकल फेऱ्याही रद्द करण्यात आल्याचे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.

बेलापूर - खारकोपर आणि नेरुळ - खारकोपर लोकल सेवा सुरू राहील. सीएसएमटी - वाशी विशेष लोकल फेऱ्या चालवण्यात येणार असून ठाणे - वाशी, नेरुळ ट्रान्स हार्बर सेवाही सुरळीत असणार आहेत. पश्चिम रेल्वेवरही सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत मेगा ब्लॉक असेल. त्यामुळे सांताक्रूझ - गोरेगावदरम्यान जलद मार्गावरील लोकल धिम्या मार्गावरून चालवण्यात येतील.

मध्य रेल्वेवरील भायखळा - माटुंगादरम्यान दोन्ही जलद मार्गांवर शनिवारी रात्रीपासून मेगा ब्लॉक घेऊन कामे करण्यात येणार आहेत. सीएसएमटी दिशेने जाणाऱ्या जलद मार्गावर शनिवारी रात्री ११.३० ते पहाटे ४.०५ वाजेपर्यंत आणि डाऊन जलद मार्गावर मध्यरात्री १२.४० ते पहाटे ५.४० वाजेपर्यंत ब्लॉक असेल.

Reliance
Industries Limited
Growth is Life
नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८
ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

### ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशील | संपलेले तिमाही ३० जून, २०२२ | संपलेले तिमाही ३० जून, २०२१ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | २,४२,९८२ | १,५८,८६२ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | १९,८६९ | १४,४९० |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **२,२३,११३** | **१,४४,३७२** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | २७,२३६ | १७,२७० |
| करपूर्व नफा | २७,२३६ | १७,२७० |
| कालावधीसाठी नफा* | १९,४४३ | १३,८०६ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर पश्चात)* | १२,९२९ | १६,८९० |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी ₹१०/- मूल्याचा | ६,७६५ | ६,५५० |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी** | | |
| प्रति इक्विटी समभाग मिळकत (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रत्येकी) (वार्षिकीकृत नाही) | | |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | २६.१४ | १८.९६ |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | २६.१४ | १८.९६ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | २६.१४ | १८.६३ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | २६.१४ | १८.६३ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट
**३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाचा पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹७,७२,७२० कोटी.

टिपा:

१. २२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.

२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| तपशील | संपलेले तिमाही ३० जून, २०२२ | संपलेले तिमाही ३० जून, २०२१ |
|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १,५७,७१६ | ९४,८०३ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ६,३७३ | ४,२३३ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१,५१,३४३** | **९०,५७०** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | १९,६७२ | १०,९८८ |
| करपूर्व नफा | १९,६७२ | १०,९८८ |
| कालावधीसाठी नफा | १५,०९६ | ८,५९१ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (कर पश्चात) | १०,४६६ | ७,३२८ |

३. ३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचे तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आले आहेत व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.

३० जून, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीचे तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर (www.bseindia.com / www.nseindia.com) आणि कंपनीच्या वेबसाईटवर (www.ril.com) येथे उपलब्ध आहेत.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २२ जुलै, २०२२

www.ril.com

### राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेंच यांच्या समोर
### सीए(सीएए)/५६/एमबी/२०२१
### कंपनी विनंतीअर्ज सीए(सीएए) नं. १४०/एमबी/२०२२
### या संबंधित
### कंपनी विनंतीअर्ज सीए(सीएए) नं. ११९/एमबी/२०२२

कंपन्या अधिनियम, २०१३च्या प्रकरणात;

आणि

कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम २३० व २३२ आणि कंपन्या अधिनियम, २०१३ च्या अन्य संबंधित तरतुदी अंतर्गत विनंतीअर्जाच्या प्रकरणात;

आणि

खालील कंपन्याच्या व्यवस्थापनेच्या संयुक्त योजनेच्या प्रकरणात
पिरामल एन्टरप्रायझेस लिमिटेड (विनंतीअर्जदार कंपनी १/विलिन झालेली कंपनी / एकत्रीकृत एफएस कंपनी)
पिरामल फार्मा लिमिटेड (विनंतीअर्जदार कंपनी २/परिणामी कंपनी/एकत्रीकृत फार्मा कंपनी)
कन्व्हर्जन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड (विनंतीअर्जदार कंपनी ३/एकत्रीकरण होत असलेली फार्मा कंपनी १)
हेम्मो फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड (विनंतीअर्जदार कंपनी ४/एकत्रीकरण होत असलेली फार्मा कंपनी २)
पीएचएल फिनइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड (विनंतीअर्जदार कंपनी ५/ एकत्रीकरण होत असलेली एफएस कंपनी)
आणि त्यांचे संबंधित भागधारक व धनको

पिरामल एन्टरप्रायझेस लिमिटेड }
[सीआयएन : एल२४११०एमएच१९४७पीएलसी००५७१९ } ........ विनंतीअर्जदार कंपनी १/एकत्रीकृत एफएस कंपनी/विलिन झालेली कंपनी

पिरामल फार्मा लिमिटेड }
[सीआयएन : यू२४२९७एमएच२०२०पीएलसी३३८५९२ } ........ विनंतीअर्जदार कंपनी २ / एकत्रीकृत फार्मा कंपनी / परिणामी कंपनी

कन्व्हर्जन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड }
[सीआयएन : यू२४१००एमएच२०१४पीटीसी३७३५०७ } ........ (विनंतीअर्जदार कंपनी ३ / एकत्रीकृत फार्मा कंपनी १)

हेम्मो फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड }
[सीआयएन : यू१७१००एमएच१९७९पीटीसी०२११८५७ } ........ (विनंतीअर्जदार कंपनी ४ / एकत्रीकरण होत असलेली फार्मा कंपनी २)

पीएचएल फिनइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड }
[सीआयएन : यू६७१२०एमएच१९९४पीटीसी०७८८४० } ........ (विनंतीअर्जदार कंपनी ५ / एकत्रीकरण होत असलेली एफएस कंपनी)

**विनंती अर्जाच्या सुनावणीची नोटीस**

याद्वारा सूचना देण्यात येते की कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम २३०-२३२ अंतर्गत पिरामल एन्टरप्रायझेस लिमिटेड, पिरामल फार्मा लिमिटेड, कन्व्हर्जन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, हेम्मो फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, पीएचएल फिनइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड ("विनंतीअर्जदार कंपन्या" म्हणून एकत्रीतरित्या संदर्भित) आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि धनको (यापुढे "योजना" म्हणून संदर्भित) यांच्यामधील व्यवस्थापनेच्या संयुक्त योजनेस मंजूरी मागत असलेला अर्ज ११ जुलै, २०२२ रोजी माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेंच ("माननीय न्यायाधिकरण") यांच्या समोर सादर केला होता. उक्त कंपनी विनंतीअर्ज १९ जुलै, २०२२ रोजी दिलेल्या आदेशाद्वारा माननीय न्यायाधिकरणाद्वारा दाखल करून घेतला होता आणि ०३ ऑगस्ट, २०२२ रोजी स. १०.३० वा. किंवा त्यानंतर लवकरच माननीय न्यायाधिकरणासमोर अंतिम सुनावणीकरिता निश्चित केला आहे.

जर कोणतीही संबंधित व्यक्ती उक्त कंपनी विनंतीअर्जास समर्थन किंवा विरोध करण्यास इच्छुक असल्यास, त्याने / तिने माननीय न्यायाधिकरण आणि विनंतीअर्जदार कंपन्यांच्या अॅडव्होकेट्सकडे उक्त कंपनी अर्जदाराच्या अंतिम सुनावणीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी उशिरात उशिरा २ दिवसांच्या आत माननीय न्यायाधिकरण आणि विनंतीअर्जदार कंपन्यांच्या अॅडव्होकेट्सकडे जेणेकरून पोहोचतील अशा बेताने, त्याचे / तिचे नाव व पत्त्यासह, त्याच्या/ तिच्याद्वारा स्वाक्षरीकृत किंवा त्याच्या / तिच्या अॅडव्होकेटद्वारा, त्याच्या / तिच्या उद्देशाची सूचना, सिरिल चेंबर्स, पेनिनसूला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३ येथे त्याबाबत अर्ज पाठवावेत. जेथे सदर संबंधित व्यक्ती उक्त कंपनी विनंतीअर्जास विरोध करीत असल्यास, त्याच्या / तिच्या विरोधाची कारणे किंवा त्याचे / तिचे शपथपत्र सदर नोटीससह सादर केले पाहिजे.

उक्त कंपनी विनंतीअर्जाची प्रत त्याकरिता विहित आकाराच्या प्रदानावर, कोणत्याही संबंधित व्यक्तीस सदर प्रत आवश्यक असल्यास, उशिरात उशिरा उक्त कंपनी विनंतीअर्जाच्या सुनावणीकरिता निश्चित केलेल्या तारखेच्या २ (दोन) दिवस आधी आणि कामकाजाच्या कोणत्याही दिवशी (शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्या वगळता) स. ११.०० व दु.०४.०० दरम्यान विनंतीअर्जदार कंपन्यांच्या अॅडव्होकेट्सकडून प्राप्त करता येईल.

आज दिनांक २२ जुलै, २०२२

*बिपीन सिंह*
*कंपनी सचिव*
पिरामल एन्टरप्रायझेस लिमिटेड
सीआयएन : एल२४११०एमएच१९४७पीएलसी००५७१९
टेलि : (९१ २२) ३८०२ ३०००/४०००
ईमेल : complianceoffice.pel@piramal.com
पत्ता : पिरामल अनंता, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, कमानी जंक्शन, एलबीएस मार्ग, कुर्ला (प), मुंबई-४०००७०, महाराष्ट्र.

*तन्या सानिश*
*कंपनी सचिव*
पिरामल फार्मा लिमिटेड
सीआयएन : यू२४२९७एमएच२०२०पीएलसी३३८५९२
टेलि : (९१ २२) ३८०२ ३०००/४०००
ईमेल : corporate.secretarial@piramal.com
पत्ता : तळमजला, पिरामल अनंता, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, कमानी जंक्शन, एलबीएस मार्ग, कुर्ला (प), मुंबई-४०००७०, महाराष्ट्र.

*अक्षीता जैन*
*कंपनी सचिव*
कन्व्हर्जन्स केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड
सीआयएन : यू२४१००एमएच२०१४पीटीसी३७३५०७
टेलि : (९१ २२) ३८०२ ३०००/४०००
ईमेल : corporate.secretarial@piramal.com
पत्ता : तळमजला, पिरामल अनंता, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, कमानी जंक्शन, एलबीएस मार्ग, कुर्ला (प), मुंबई-४०००७०, महाराष्ट्र.

*अमित बापट*
*संचालक*
हेम्मो फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड
सीआयएन : यू१७१००एमएच१९७९पीटीसी०२११८५७
टेलि : (९१ २२) ३८०२ ३०००/४०००
ईमेल : corporate.secretarial@piramal.com
पत्ता : ११४, टर्फ इस्टेट, ३/६५, ऑफिस. डॉ. इ. मोजेस रोड, महालक्ष्मी, मुंबई -४०००११ महाराष्ट्र

*देवेश चौधरी*
*मुख्य वित्त अधिकारी*
पीएचएल फिनइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड
सीआयएन : यू६७१२०एमएच१९९४पीटीसी०७८८४०
टेलि : (९१ २२) ३८०२ ३०००/४०००
ईमेल : corporate.secretarial@piramal.com
पत्ता : ४था मजला, पिरामल टॉवर, पेनिनसुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३ महाराष्ट्र